Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# विधवा व परित्यक्ता महिला आणि आर्थिक असुरक्षितता: जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विधवा व परित्यक्ता महिलांचा व्यष्टी अभ्यास

**शुभांगी संजय सोनवणे,** संशोधक विद्यार्थी, क. ब. चौ. उ. म. वि. जळगाव.
**डॉ. बी. एस. भालेराव,** अर्थशास्त्र विभाग प्रमुख, सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख महाविद्यालय, भडगाव जि. जळगाव

**सारांश**

भारतीय समाजात विधवा व परित्यक्ता महिलांना कलंक, मालमत्तेच्या अधिकारापर्यंत मर्यादित प्रवेश, शाश्वत उत्पन्नाचा अभाव या विशेष आव्हानांचा सामना करावा लागतो. पतीच्या निधनानंतर आर्थिक, सामाजिक, आणि मानसिक स्तरावर त्यांच्यासमोरील समस्या गंभीर होतात. विशेषतः ग्रामीण आणि निमशहरी भागांतील विधवा महिलांना कुटुंबातील जबाबदाऱ्या, आर्थिक अस्थिरता, आणि सामाजिक दबाव यांचा सामना करावा लागतो. जळगाव जिल्हा सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण असल्यामुळे या भागातील विधवा महिलांच्या परिस्थितीचा अभ्यास महत्वाचा ठरतो.

**कळ शब्द (Key Words):** विधवा व परित्यक्ता महिला, आर्थिक असुरक्षितता, जळगाव जिल्हा, शासकीय योजना.

**प्रस्तावना**

देशातील नागरिकांचे सामाजिक आणि आर्थिक कल्याण साधने ही कल्याणकारी राज्याची जबाबदारी असते. भारतासारख्या विकसनशील देशात मुख्यतः महिलांमध्ये विधवा, परित्यक्ता, वृद्ध, भिकारी व बेघर, वेश्या, अपराधी, शारीरिक आणि मानसिक दुर्बल महिला त्याचबरोबर अनुसूचित जाती-जमाती आणि वंचित समाजातील महिलांचा विकास करणे आवश्यक आहे. भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सामाजिक कल्याणातंर्गत महिलांच्या कल्याणाची तरतूद करण्यात आली आहे. प्रामुख्याने कलम 39 क नुसार स्त्री-पुरुष दोघांनाही समान अधिकार, समान संधी देण्याची व्यवस्था केली गेली आहे. निसर्गतः एकूण लोकसंख्येच्या अर्धी लोकसंख्या महिलांची आहे. कायदेशीर दृष्टीने त्यांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार असले पाहिजेत परंतु वास्तविक परिस्थिती यापेक्षा भिन्न आहे. प्राचीन काळापासून तर वर्तमान कालखंडापर्यंतचा अभ्यास केला असता असे दिसून येते कि, सर्व कालखंडामध्ये महिलांना पुरुषांपेक्षा निम्न दर्जा देण्यात आला आहे. देशपातळीवरील अभ्यासामध्ये सर्वात जास्त विधवा उत्तरप्रदेश (4,856,188) महाराष्ट्र (4,520,764) आणि आंध्रप्रदेश (4,297,481) मध्ये आहेत परित्यक्ता महिलांचे सर्वाधिक प्रमाण महाराष्ट्र (154,274) पश्चिम बंगाल (125,744) गुजरात (88,753) इतके आहे.सर्वात कमी विधवा दमन आणि दिव (296) लक्षद्वीप (2,448) दादर नगर हवेली(348), सिक्कीम (676) प्रदेशांमध्ये आहे. विधवांचा विविध राज्यांमध्ये लोकसंख्येतील मोठा हिस्सा दिसून येतो, ज्यामध्ये सामाजिक आव्हाने, मृत्यूदर आणि सांस्कृतिक परंपरा इत्यादीचा प्रभाव स्पष्ट होतो. घटस्फोटांच्या संख्येमध्ये विधवांच्या तुलनेत लक्षणीय घट दिसून येते, परंतु त्या बदलत्या कौटुंबिक रचनेचे आणि विविध भागांतील सामाजिक स्वीकाराचे प्रतिबिंब दर्शवितात. (Ministry of women and child development, government of India 2023). विधवा व परित्यक्ता महिलांच्या आर्थिक असुरक्षिततेचा विषय त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक स्थितीशी संबंधित आहे. भारतातील विशेषतः ग्रामीण


Copyright © | JET Network, All Rights Reserved

आणि मागासलेल्या भागांमध्ये विधवा होणे म्हणजे केवळ वैयक्तिक दुःखच नव्हे तर ती महिलेसाठी आर्थिकदृष्ट्याही मोठी आव्हानात्मक अवस्था बनते.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विधवा व परित्यक्ता महिलांना येणाऱ्या सामाजिक व आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.
2. जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विधवा व परित्यक्ता महिलांना येणाऱ्या सामाजिक व आर्थिक समस्यांवर उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पद्धती**

प्राथमिक तथ्य संकलन: जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विधवा व परित्यक्ता महिलांची स्थिती समजावून घेण्यासाठी प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे साकळी, सावखेडा, पाळधी, विचवा, नेरी, सावदे, रिंगणगाव, पथराड, दोणगाव आणि लाडली अशा एकूण 10 गावामधील प्रत्येकी 6 अशा एकूण 60 विधवा व परित्यक्ता महिलांची स्तरीय नमूना पद्धतीद्वारे निवड करून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती गोळा करण्यात आली आहे.

द्वितीयक तथ्य संकलन: विविध ग्रंथ, मासिके, संशोधन निबंध, सरकारी अहवाल व शासकीय योजना इत्यादींचा आढावा घेण्यात आला आहे.

**आर्थिक असुरक्षितता**

आर्थिक असुरक्षितता ही व्यक्ती आणि समाजाच्या समग्र विकासासाठी मोठी अडथळा ठरते. ती केवळ गरिबीच्या अवस्थेसोबतच संबंधित नसून, ती सामाजिक स्थैर्य, उत्पन्नाचा समतोल, आणि आर्थिक पायाभूत सुविधांशी निगडित आहे.

आर्थिक असुरक्षिततेला कमी करण्यासाठी मजबूत सामाजिक सुरक्षा जाळे आणि शाश्वत आर्थिक धोरणांची अंमलबजावणी आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) आर्थिक असुरक्षिततेला अशा अवस्थेसोबत जोडते जिथे व्यक्तीला गरिबी, बेरोजगारी, किंवा उत्पन्नाच्या तात्पुरत्या किंवा दीर्घकालीन कमतरतेमुळे आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागते.

आर्थिक असुरक्षितता मोजण्यासाठी काही प्रमुख घटक विचारात घेतले जातात:

1. गरिबी रेषेच्या खाली असलेली लोकसंख्या: जिथे व्यक्तीला किमान उपजीविकेसाठी आवश्यक संसाधने मिळत नाहीत.
2. बेरोजगारीचे प्रमाण: नोकरी किंवा उत्पन्न मिळवण्याच्या संधींचा अभाव.
3. आर्थिक विषमता: उत्पन्नाचे असमान वाटप आणि सामाजिक-आर्थिक स्तरांमध्ये असलेली तफावत.
4. सामाजिक सुरक्षेची उपलब्धता: वैद्यकीय सेवा, पेन्शन योजना, आणि इतर कल्याणकारी उपायांचा अभाव.

**संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा**

1. प्रा. मरगीळ गजानन (2021), "परभणी जिल्हयातील भग्न कुटुंबातील सामाजिक परिस्थितीचे अध्ययन एक विशेष अभ्यास" अप्रकाशित शोधप्रबंधमध्ये असे मत मांडले आहे की, भग्न कुटुंबातील महिलाना अनेक सामाजिक व आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते याचा परिणाम कुटुंबातील मुलांवर होतो त्यासाठी यावर आर्थिक तरतुद करण्यात यावी.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

2. स्त्री प्रतिष्ठा विद्याबाळ " कुसुमांजली महिला विशेषांक (1998-99) सौभाग्यवती, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीता हे जसे पुरुषांशी जोडून ठेवलेले घटक स्त्रीचे स्थान ठरवतात. व त्यातुन स्त्री जीवनातील तिची प्रतिष्ठा व तिचा आत्मसन्मान पुरुषसापेक्ष पद्धतीने न मोजता स्वतंत्रपणे मोजला जायला हवा हे मत व्यक्त केले आहे.
3. बंगारी. वाय. शांता (2004), Status of widows in rural India A sociological Study Karnataka University. Dharwad शोधनिबंधात धारवाड जिल्हयातील सहा गावातील विधवा महिलांच्या दर्जाविषयी अभ्यासमध्ये विधवांचा सामाजिक आर्थिक, शैक्षणिक, मानसिक, धार्मिक इत्यादी विषयक दर्जाचे अध्ययनात हिंदू विधवा महिलाचे प्रमाण इतर धर्मापेक्षा जास्त दिसुन आले. बालविवाहाचे प्रमाण जास्त तर पुनर्विवाहाचे प्रमाण कमी दिसुन आले. 97% विधवा सौभाग्य शृंगार करत नाहीत. एकंदरीत सामाजिक परंपरांचे बंधन विधवा महिलांवर आजही आहे असे सदरील संशोधनाच्या अभ्यासावरून स्पष्ट होते.
4. नौरेम जितेश्वरी देवी, (2001), तरुण विधवा महिलांच्या मानसिकतेवर योगाचा परिणाम कशाप्रकारे होतो या विषयासंदर्भात हा अभ्यास केलेला आहे निरक्षर विधवांपेक्षा साक्षर विधवांचे प्रमाण कमी आहे तसेच मजुरी, शेतमजुरी करणाऱ्या विधवांचे प्रमाण देखील येथे जास्त असल्याचे दिसून आले.
5. चौक विजया (डिसेंबर 1993), यांनी परित्यक्तांचे प्रश्न चळवळीचा आढावा सर्वेक्षण पाहणी अहवाल साधना साप्ताहिकात प्रकाशित केला आहे. परीत्यक्ता स्त्रियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते त्यांना गुलामगिरीची वागणूक मिळते म्हणजे परित्यक्ता महिला समाजातील विषमतेचे प्रतीक ठरत आहे असे स्पष्ट केले आहे.
6. काळंगे रंजना (1995), यांनी सातारा जिल्ह्यातील परित्यक्ता स्त्रियांच्या संदर्भात पाहणी अहवाल डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी व स्त्रिया कल्याण केंद्र सातारा येथे सादर केला. या अहवालात स्त्रिया परित्यक्ता बनण्याच्या कारणांचा शोध घेतला. परित्यक्ता स्त्रियांच्या मानसिक व शारीरिक छळ, चरित्रावर संशय, अपत्य न होणे होण्यासाठी त्रास होणे यामुळे त्या विभक्त राहतात. या महिलांनी जर दुसरा विवाह केलेला असेल तर तिला पोटगी मिळण्यात अडचणी येतात प्रचलित कायदा व त्याचे स्त्रिया काहीही करू शकत नाही असे निदर्शनास आले.
7. पाटील डॉ. लीला (ऑगष्ट1998), यांनी परित्यक्ता स्त्रिया आणि त्यांच्या जीवनातील समस्या संघर्ष समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन यावर प्रकाश टाकला आहे.
8. इंगोले कृ. जो. (1981), यांचा 'मराठी साहित्यातील विधवा जीवनाचे दर्शन इसवी सन 1818 -1920' ह्या प्रबंधात वैदिक कालखंडापासून ते विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापर्यंत विधवा महिलांचे जीवन रेखाटले आहे. तसेच विधवाविषयक चळवळीचे अध्ययन, पुनर्विवाह, सती बाबत घडलेली प्रकरणे, समाजासमोर आलेल्या प्रश्नांच्या समस्यांची सविस्तरपणे मांडणी केलेला आहे.
9. रानडे प्रतिभा (2005), यांनी 'स्त्री प्रश्नांची चर्चा 19वे शतक' या पुस्तकात 19 व्या शतकामध्ये स्त्रियांच्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, कौटुंबिक इत्यादींसारख्या अनेक समस्यांची मांडणी केली आहे. वैचारिक क्रांती किंवा त्यांच्याविषयक समाजाचा वाईट दृष्टिकोन बदलण्याचा प्रयत्न सदरील लेखनातून केलेला आहे.

**विधवा व परित्यक्ता महिलांसाठी केंद्र सरकारद्वारे खालील महत्वाच्या योजना राबविल्या जातात.**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

1. इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती योजना ( Indira Gandhi National Widow Pension Scheme (IGNWPS)
2. महिला समृद्धी योजना (Mahila Samridhi Yojana)
3. राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना (National Family Benefit Scheme (NFBS)
4. सुकन्या समृद्धी योजना (Sukanya Samriddhi Yojana (Extended Benefits)
5. विधवा आणि परित्यक्ता महिला पुनर्वसन कार्यक्रम (Widow and Destitute Women Rehabilitation Program)

**विधवा व परित्यक्ता महिलांसाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रमुख योजना :**

1. संजय गांधी निराधार योजना (Sanjay Gandhi Niradhar Anudan Yojana)
2. श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजन (Shravan Bal Seva Rajya Nivruttivetan Yojana)
3. घरकुल योजना (Gharkul Yojana)
4. बाल संगोपन योजना (Bal Sangopan Yojana)
5. मनोधर्य योजना (Manodhairya Yojana)
6. राजमाता जिजाऊ योजना (Rajmata Jijau Yojana)
7. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना (Mukhyamantri mazi Ladki bahin Yojana)

**परिशिष्ट : 1**

**तक्ता क्र.1.1 महाराष्ट्र राज्यातील विधवा आणि परित्यक्ता महिलांची स्थिती**

| क्षेत्र | वयोगट | विधवा महिला | परित्यक्ता महिला |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र राज्य | सर्व वयोगट | 2026764 | 113705 |
| | 20 पेक्षा कमी | 5031 | 389 |
| | 20-29 | 30782 | 7761 |
| | 30-39 | 200239 | 31851 |
| | 40-49 | 412462 | 36840 |
| | 50-59 | 429897 | 20138 |
| | 60-69 | 535892 | 12452 |
| | 70-79 | 311543 | 3241 |
| | 80 पेक्षा जास्त | 94349 | 690 |
| ग्रामीण भाग | सर्व वयोगट | 1091845 | 73592 |
| | 20 पेक्षा कमी | 2683 | 233 |
| | 20-29 | 19619 | 5027 |
| | 30-39 | 117069 | 20489 |
| | 40-49 | 213481 | 23161 |
| | 50-59 | 204284 | 12892 |
| | 60-69 | 298436 | 8801 |
| | 70-79 | 182898 | 2343 |
| | 80 पेक्षा जास्त | 50244 | 438 |


Copyright © | JET Network, All Rights Reserved

स्त्रोत : भारताची जनगणना 2011

तक्ता क्र.1.1 नुसार- 2011 च्या महाराष्ट्रातील जनगणनेनुसार वेगवेगळ्या वयोगटांतील आणि ग्रामीण भागातील महिलांच्या विधवत्व आणि परित्यक्ता आकडेवारी दर्शविली आहे. महाराष्ट्र राज्यात एकूण विधवा महिला 20,26,764 असून एकूण परित्यक्ता महिलांची संख्या 1,13,705 एवढी आहे. ग्रामीण भागात विधवांची संख्या 10,91,845 असून परित्यक्ता महिला 73,592 एवढ्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केल्यास सर्वाधिक विधवांचे प्रमाण असलेला वयोगट 60-69 वर्षे (5,35,892 विधवा) आहे. तसेच ग्रामीण भागात सुद्धा हाच वयोगट अधिक आहे (2,98,436 विधवा). सर्वात कमी संपूर्ण महाराष्ट्रासाठी 20 वर्षांपेक्षा कमी (5,031 विधवा) आहे. तर ग्रामीण भागामध्ये सुद्धा हाच वयोगट आहे (2,683 विधवा).सर्वाधिक परित्यक्ता महिलांची संख्या महाराष्ट्रामध्ये 40-49 वर्षे वयोगट असून (36,840 घटस्फोट). ग्रामीण भागामध्ये
सुद्धा हाच वयोगट आहे 40-49 वर्षे (23,161 घटस्फोट). सर्वात कमी वयोगट 20 वर्षांपेक्षा कमी (389 घटस्फोट) ग्रामीण: 20 वर्षांपेक्षा कमी (233 घटस्फोट) आहे. ग्रामीण भागात एकूण विधवांची संख्या 54% आणि परित्यक्ता संख्या 65% आहे. बहुतेक वयोगटांमध्ये ग्रामीण भागातील संख्या शहरी भागाच्या तुलनेत जास्त आहे, जे लोकसंख्याशास्त्रीय आणि सांस्कृतिक फरक दर्शवते.

**तक्ता क्र. 1.2 जळगाव जिल्ह्यामधील मधील विधवत्व आणि घटस्फोटाचे विश्लेषण**

| ग्रामीण/शहरी | वयोगट | विधवा महिला | परित्यक्ता महिला |
|---|---|---|---|
| संपूर्ण जळगाव जिल्हा | संपूर्ण वयोगट | 82049 | 3230 |
| | 20 पेक्षा कमी | 261 | 12 |
| | 20-29 | 1301 | 273 |
| | 30-39 | 8311 | 980 |
| | 40-49 | 15510 | 934 |
| | 50-59 | 14947 | 519 |
| | 60-69 | 23302 | 360 |
| | 70-79 | 14315 | 99 |
| | 80 पेक्षा जास्त | 3508 | 31 |
| ग्रामीण भाग | संपूर्ण वयोगट | 59849 | 2463 |
| | 20 पेक्षा कमी | 177 | 11 |
| | 20-29 | 989 | 216 |
| | 30-39 | 6155 | 748 |
| | 40-49 | 10895 | 702 |
| | 50-59 | 10178 | 378 |
| | 60-69 | 17432 | 298 |
| | 70-79 | 11088 | 74 |
| | 80 पेक्षा जास्त | 2538 | 22 |
| शहरी भाग | सर्व वयोगट | 22200 | 767 |
| | 20 पेक्षा कमी | 84 | 1 |
| | 20-29 | 312 | 57 |
| | 30-39 | 2156 | 232 |
| | 40-49 | 4615 | 232 |


Copyright © | JET Network, All Rights Reserved

| | | | |
|---|---|---|---|
| | 50-59 | 4769 | 141 |
| | 60-69 | 5870 | 62 |
| | 70-79 | 3227 | 25 |
| | 80 पेक्षा जास्त | 970 | 9 |
| स्त्रोत: भारताची जनगणना 2011 | | | |

तक्ता क्र.1.2 नुसार- जळगाव जिल्ह्यात विधवा आणि घटस्फोटित महिलांच्या लोकसंख्याशास्त्रीय विभागणी केली आहे. ज्यामध्ये ग्रामीण आणि शहरी लोकसंख्या स्वतंत्रपणे दर्शविलेली आहे. ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येमध्ये विधवत्व आणि घटस्फोटाचे महत्त्व अधोरेखित होते. सर्व वयोगटांमध्ये 82,049 विधवा आणि 3,230 परित्यक्ता महिला असल्याचे स्पष्ट होते. आकडेवारी असे दर्शविते की, विधवा प्रामुख्याने 60-69 वयोगटात अधिक आढळतात, तर घटस्फोटाचे प्रमाण विशेषतः ग्रामीण भागातील 30-39 वयोगटात जास्त आहे. तसेच, कमी वयाच्या आणि जास्त वयाच्या गटांमध्ये विधवत्व आणि परित्यक्ता प्रमाण तुलनेने कमी आहे. सर्व वयोगटांमध्ये जळगाव जिल्ह्यात एकूण 82,049 विधवा आणि 3,230 परित्यक्ता महिला आहेत. खालील प्रमुख मुद्यांद्वारे अधिक स्पष्ट केले आहे.

**दुय्यम तथ्यांवरून निष्कर्ष**

1. विधवत्वाचे प्रमाण विशेषतः 60-69 वयोगटातील महिलांमध्ये वृद्ध वयोगटांमध्ये अधिक आहे.
2. 40-49 वयोगटातील महिलांमध्ये परित्यक्ताचे प्रमाण जास्त आहे, जे मध्यम वयातील वैवाहिक आव्हानांवर प्रकाश टाकते.
3. तरुण वयोगटांमध्ये (20 वर्षेपेक्षा कमी) विधवत्व आणि परित्यक्ता प्रमाण सर्वात कमी आहे.
4. ग्रामीण भागात विधवा आणि परित्यक्ता महिलांची संख्या सतत जास्त दिसून येते, जी सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक घटकांवर आधारित असू शकते.
5. जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागात 59,849 विधवा, तर शहरी भागात 22,200 विधवा आढळतात.
6. जळगाव जिल्ह्यात विधवांची संख्या सर्वाधिक 60-69 वयोगटात आहे (एकूण: 23,302, ग्रामीण: 17,432, शहरी: 5,870).
7. जळगाव जिल्ह्यात परित्यक्ता प्रमाण 30-39 वयोगटात जास्त आहे, विशेषतः ग्रामीण भागात (748 प्रकरणे) आणि शहरी भागात सर्वात कमी वयोगटात (20 वर्षांखालील) विधवा (261) आणि परित्यक्ता प्रमाण (12) अत्यंत कमी आहे.
8. जळगाव जिल्ह्यातील जास्त वयोगटातील लोकसंख्या (80 वर्षांवरील) तुलनेने कमी परित्यक्ता महिला (31), पण अधिक विधवा (3,508) दर्शवते.

**प्राथमिक तथ्यांवरून निष्कर्ष**

1. बहुसंख्य मुलाखतदाते महिला (62.22%) 31 ते 40 वर्षे वयोगटातील होते. सर्वात कमी 37.78% कमी 60 पेक्षा जास्त वयोगटातील आढळले.
2. शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरणामध्ये उत्तरदात्यापैकी 40.02 % माध्यमिक शिक्षण घेतलेले 30.08 प्राथमिक शिक्षण घेतलेले 25.03 % निरक्षर तर 4.87% उच्च शिक्षण घेतलेले आढळले.
3. 66.23 % उत्तरदात्या महिलांचे प्रमुख रोजगाराचे साधन रोजंदारी मजुरी हे होते. 30.22 % महिलांकडे छोटा व्यवसाय होता. २.०३ % महिलांकडे शेती होती आणि 1.52% महिला गृहिणी होत्या.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

4. 89.65 % पेक्षा जास्त विधवा व परित्यक्ता महिलांना दरमहा ₹10,000 पेक्षा कमी उत्पन्न असलेले, शेती आणि घरकाम हे प्राथमिक व्यवसाय होते.
5. उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोतांपैकी स्वत:ची कमाई 69.34 % , नातेवाईकांकडून मदत 5.36 % सरकारी योजनांच्या माध्यमातून 15.21.%, कर्ज किवा उसने 10.09 % एवढे होते.
6. मालमत्तेचे हक्क: 69. 89% विधवांनी वडिलोपार्जित किंवा पती-पत्नीच्या मालमत्तेवर हक्क मिळविण्यात अडचणी आल्या.
7. स्वयंसहाय्यता बचत गट किवा स्वयं सेवी संस्थांचे 26.78 % सभासद होते. तर 73.22 % उत्तर दाते कोणत्याही संस्थेचे सभासद नव्हते. अनेकांनी समुदाय किंवा एनजीओ समर्थनाची कमतरता व्यक्त केली
8. शासकीय योजनांच्या बाबतीत संजय गांधी निराधार योजनेचा लाभ सर्वात जास्त उत्तरदात्या लाभार्थ्यांनी (59.32%) लाभ घेतला. तसेच विधवा पेन्शन योजना 21.69%, घरकुल योजना 4.85%, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना 9.67 % तर इतर योजनांचा 4.47 % उत्तरदात्या महिलांनी लाभ घेतला.
9. वडिलोपार्जित मिळकतीत किवा संपत्तीत मालकी हक्क मिळविताना 81.94 % उत्तरदात्या महिलांना अडचण आली..
10. आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी रोजगाराची संधी मिळावी असे 25.42.% उत्तरदात्या महिलांना वाटते तर 49.35% महिलांना सरकारी योजनांचा लाभ मिळवा असे वाटते त्याचप्रमाणे आर्थिक मदत मिळावी 15.00 % महिलांना वाटते आणि 10.23 % प्रशिक्षण व कौशल्य आधारित शिक्षण मिळावे असे वाटते.
11. 46.56% महिलांना सामाजिक आणि धार्मिक समारंभामध्ये सहभागी होण्यास मनाई करण्यात आली.
12. 86.12 % महिलांना सामाजिक भेद-भावाचा सामना करावा लागला होता.
13. केवळ 35% विधवांना पेन्शन किंवा सबसिडी यांसारख्या योजनांचा फायदा झाला, जागृतीचा अभाव आणि नोकरशाहीच्या अडथळयांमुळे शासकीय योजनांचा फारसा लाभ मिळाला नाही.
14. विधवा महिला व परित्यक्ता महिला यांनी एकाकीपणाची भावना नोंदवली, 45% उत्तरदाते सामुदायिक कार्यक्रमांमध्ये आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सामाजिक बहिष्काराचा अनुभव घेत आहेत.
15. भविष्याबाबत आर्थिक स्थितीबद्दल विचारल्यावर 42.00 महिलांनी नकारात्मक उत्तर दिले तर 48.00 महिलांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.
16. महिलांना मदत करणारे एखादे संघटन किवा संस्था आहे का? असा प्रश्न विचारला असता 31.35% महिलांनी होय असे उत्तर दिले तर 68.45% महिलांनी नकारार्थी उत्तर दिले.
17. कौटुंबिक सहकार्याबद्दल विचारले असता 78.86 % महिलांनी नकारार्थी उत्तर दिले तर 21.14% महिलांनी होकारार्थी उत्तर दिले. यावरून असे स्पष्ट होते बहुतांश महिलांना कौटुंबिक मदत किवा सहकार्य मिळत नाही.

**शिफारसी**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

1. विधवा व परित्यक्ता महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, शासन यांनी कायदेशीर मदत आणि जागरूकता मोहिमांद्वारे विधवांसाठी मालमत्ता अधिकारांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.
2. विधवा व परित्यक्ता महिलांविषयी समाजाचा दृष्टिकोन बदलण्यासाठी सामाजिक जागृती निर्माण करणे आवश्यक आहे त्यासाठी विविध उपक्रम राबविले जाणे आवश्यक आहे.
3. महिलांना स्वतंत्र रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे जरुरी आहे. त्याचप्रमाणे पेन्शन, गृहनिर्माण आणि कौशल्य विकास कार्यक्रमांसारख्या सरकारी योजनांमध्ये प्रवेश करण्यासाठी प्रक्रिया सुलभ करणे आवश्यक आहे.
4. विधवा व परित्यक्ता महिलांना मानसिक स्वास्थ्यासाठी शासकीय समुपदेशन केंद्रे स्थापन करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची:**

1. Census of India 2011.
2. Maharashtra Marital Census 2011.
3. Annexure referred to in reply to parts (a) & (b) of Rajya Sabha Unstarred Question No.3352 date:29.03.2023. Ministry of women and child development, government of India.
4. Government of Maharashtra (2021). "District Statistical Handbook: Jalgaon."
5. Bangari y. Shanta (2004). Status of widows in Rural India A Sociological study, Karnataka university sharwad, Dept of sociology.
6. Naorem Jiteswari Devi, (2001) Effect of Yoga on psychological Aspects of young widows, swami vivekananda Yoga. Anusandhana Samsthana.
7. इंगोले कृ.जो (१९८१) मराठी साहित्यातील विधवा महिलांचे जीवनाचे दर्शन इ.स. १८१८- १९२० शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर मराठी विषयाच्या पीएचडी पदवीसाठी सादर करण्यात आलेला अप्रकाशित शोध प्रबंध.
8. चौक विजया (डिसेंबर१९९३) "परित्यक्तांचे प्रश्न: चळवळीचा आढावा सर्वेक्षणात्मक पाहणी अहवाल, साधना साप्तहिकात प्रकाशित.
9. काळंगे रंजना (१९९५) "सातारा जिल्ह्यातील परित्यक्ता संदर्भात पाहणी अहवाल" डॉ बाबासाहेब आंबेडकर अकादमी आणि स्त्रिया कल्याण केंद्र सातारा येथे सादर.
10. पाटील डॉ. लीना (ऑगस्ट १९९८), "परित्यक्ता, " पुणे मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथम आवृत्ती' पु. क, १५
11. प्रा. मरगीळ गजानन "परभणी जिल्हयातील भग्न कुटुंबातील सामाजिक परिस्थितीचे अध्ययन एक विशेष अभ्यास" अप्रकाशित पीएचडी शोध स्वा.रा.ती.म. वि, 2021.
12. स्त्री प्रतिष्ठा - विदयाबाळ, कुसुमांजली महिला विशेषांक १९९८-९९, पान नं 32.
13. आंतरराष्ट्रीय संस्था, लुंबा फाउंडेशन क्रियाकलाप अहवाल (2017-2021)
14. रानडे प्रतिभा (२००५), स्त्री प्रश्नांची चर्चा: एकोणिसावे शतक, पुणे, पद्मगंधा प्रकाशन.


Copyright © | JET Network, All Rights Reserved